वाचले :-१) श्रीमती.नर्मदाबाई महेंद्रभाई अमीन व इ.२ सर्व रा.संगमेश्वर ता.मालेगांव जि.नाशिक यांचा अर्ज दिनांक २९/१०/२०१० व पुरवणी अर्ज दिनांक :०२/०९/२०११

२) मा.आयुक्त,मालेगांव महानगरपालिका,मालेगांव यांचे कडील पत्र क्र/नगर रचना/जा.क्र/०६/२०११ दिनांक:०८/०८/२०११ चा सुधारीत मंजुर अभिन्यास.

३) मुळ प्रकरण पानांक १ ते ११५ सह टिपणी संचिका.

---

अपर जिल्हाधिकारी कार्यालय,मालेगांव
क्रमांक/वि.शे.प./एसआर/३३/२०१०
मालेगांव दिनांक ७४/१०/२०११

## आदेश :

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ कलम ४४ प्रमाणे व त्याखालील नियमान्वये श्रीमती.नर्मदाबाई महेंद्रभाई अमीन व इ.२, सर्व रा.संगमेश्वर ता.मालेगांव, जि.नाशिक यांना मौजे संगमेश्वर ता.मालेगांव जि.नाशिक येथिल स.नं. ३०२/अ पैकी, क्षेत्र २७२५६.४१ चौ.मि.पैकी क्षेत्र १८४१८.९३चौ.मी. प्लॉट नं. १ ते ११ या क्षेत्रास रहिवास या कारणासाठी अकृषिक प्रयोजनासाठी परवानगी खालील अटींवर देण्यात येत आहे.

अटी व शर्ती : -

१) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ कलम व त्याखालील नियम व महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम (सुधारीत १९७९ चे) अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

२) परवानादार यांनी आदेशातील प्लॉट व प्लॉटचे विभाजन म.अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांचे पुर्व समंतीशिवाय करु नये.

३) परवानादार यांनी सदरहु जमिन व त्यावरील बिल्डींग अथवा बांधकामाचा उपयोग ज्या कारणासाठी अकृषिक परवानगी दिली आहे, त्याचा कारणासाठी करावा, तसेच सदरहु जमिनीचा किंवा सदरहु जमिनीपैकी काही भागाचा अथवा त्यावरील बिल्डींगचा अथवा बांधकामाचा उपयोग दुसऱ्या कारणासाठी करावयाचा झाल्यास त्यास म.अपर जिल्हाधिकारी मालेगांव यांची लेखी पुर्व संमती घ्यावी त्याच कारणासाठी बिल्डींगचा उपयोग हा संपुर्ण जमिनीचा उपयोग म्हणुन मानण्यात येईल.

४) परवानादार यांनी हा आदेश दिलेल्या तारखेपासुन एक वर्षाचे आंत जमिनीची सुधारणा, मंजुर लेआऊटप्रमाणे म्हणजे रस्ते, ड्रेनेज इ करावी की, ज्यामुळे म.अपर जिल्हाधिकारी व संबंधित नगरपालिका यांची संमती राहील. त्याचप्रमाणे सदरहू लेआऊट मधील प्लॉटची मोजणी व रेखांकन सर्व्हे खात्याकडुन करुन घ्यावा व जो पर्यंत जमिनीची सुधारणा होत नाही तोपर्यंत त्यामधील प्लॉटची विल्हेवाट कोणत्याही तऱ्हेने लावु नये.

५) परवानादार यांना सदरहु जमिनीतील प्लॉटची विल्हेवाट कोणत्याही तऱ्हेने लावली तर परवानदार यांची जबावदारी राहील की सदरहु व प्लॉटची विक्री किंवा विल्हेवाट आदेशातील शर्तीस अधिन राहुन अथवा सनदेमधील शर्तीस अधिन राहुन करावी.

६) सदरहु परवानगी ही देखाव्याच्या नकाशामध्ये दाखविल्याप्रमाणे ओट्यावर बांधावयाचे बांधकामाप्रमाणे किंवा प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे बांधावयाचे बिल्डींग प्रमाणे करणेस देण्यात येत आहे. प्लॅन मध्ये दाखविल्याप्रमाणे मोकळी जागा ठेवावी.

६अ) ही परवानगी म.आयुक्त,मालेगांव महानगरपालिका मालेगांव ता.मालेगांव जि.नाशिक यांचे कडील पत्र क्रं/नगर रचना /जा.क्र./०६/२०११ दिनांक ०८/०८/२०११ चा सुधारीत मंजुर अभिन्यास अन्वये देणेत येत आहे. परवानगीदार यांनी संबंधित महानगरपालीका /नगरपालिका/सहाय्यक संचालक/ग्रामपंचायत/नगररचना यांचे कडुन योग्य ती बांधकामाची परवानगी घेतल्यानंतरच बांधकामास सुरवात करावी सदरहु अट ही परवानगीदार यांचेवर बंधनकारक आहे.

७) परवानगीदार यांनी बिल्डींग प्लॅन हे संबंधित समक्ष अधिकाऱ्याकडुन मंजुर करुन घ्यावेत. ज्या ठिकाणी समक्ष अधिकारी नाही. अशा वेळी परवानगीदार यांनी महाराष्ट्र जमिन महसुल ( जमिनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी ) नियम १९६९ अनुसूची प्रमाणे ३ प्रमाणे प्लॅन तयार करुन घेवुन तो म.अपर जिल्हाधिकारी मालेगांव यांचेकडुन मंजुर करुन घेवुन त्याप्रमाणे बांधकाम करावे.

८) परवानादार यांनी राष्ट्रीय महामार्ग जिल्हामार्ग यामधील रस्त्यांची सिमा व इमारती रांग यामधील इमारतीची रांग या नियंत्रण रेषामधील रस्त्यांपासुनचे अंतर हे महाराष्ट्र जमिन महसुल (जमिनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी) नियम १९६९ अनुसुची २ प्रमाणे ठेवावे.

९) परवानादार यांनी हा आदेश दिल्याचे तारखेपासुन एक वर्षाचे आंत अकृषिक प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावा, अन्यथा अकृषिक परवानगीची मुदत म. अपर जिल्हाधिकारी,मालेगांव यांचेकडुन वेळोवेळी वाढवुन घ्यावी तसे न केल्यास परवानगी रद्द समजणेत येईल.

१०) परवानादार यांनी अकृषिक प्रयोजन करीता जमिनीचा उपयोग सुरु केल्याबाबत अथवा उपयोगात बदल केल्याबाबत एक महिन्याचे आंत संबंधित तलाठी / तहसिलदार / अपर जिल्हाधिकारी मालेगांव यांना कळवावे, अन्यथा परवानादार यांचे विरुध्द महाराष्ट्र जमिन महसुल (जमिनच्या वापरात बदल अकृषिक, आकारणी) नियम १९६६ (६ ) प्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

११) परवानादार यांनी जमिनीचा अकृषिक सारा दर चौ.मी. स.नं.३०२/अ पैकी, क्षेत्र २७२५६.४१ चौ.मि.पैकी क्षेत्र १८४१८.९३चौ.मी. प्लॉट नं.१ ते १० ला रहिवास दर रुपये २.०५ पैसे या प्रमाणे जमीनीस ज्या अकृषीक कारणासाठी परवानगी दिली आहे. त्या कारणासाठी वापरात आणल्याचे तारखेपासुन भरावा. अकृषिक दर हा सुधारीत दर निश्चित होई पर्यंत अंमलात राहील व त्यानंतर सुधारीत दराने भरावा.



Scanned with OKEN Scanner

१२) परवानादार यांनी आकृषिक साऱ्याचे पाचपट रुपांतरीत कर त्वरीत भरावा किंवा कोणत्याही परिस्थितीत जास्तीत जास्त हा आदेश मिळालेपासुन दहा दिवसाचे आंत भरावा. तसे करणेस चुकल्यास अकृषीक परवानगी रद्द समजण्यात येईल.

१३) सदरहु आदेशामधील नमुद केलेल्या अकृषीक सारा व सनदेमधील अकृषीकसारा ज्या ज्या वेळेस अकृषीक सारा बदलेल त्या प्रमाणे सारा बदलणेवर राहील.

१४) परवानादार यांनी मोजणी फी जमिनीचा उपयोग अकृषीक कारणासाठी उपयोगात आले पासुन एक महिन्याचे आंत भरावी.

१५) म.तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांनी जमिनीची मोजणी केल्यानंतर मोजणी प्रमाणे जमिनीचे क्षेत्रात व अकृषिक साऱ्यात बदल झाल्यास त्याप्रमाणे क्षेत्र व सारा बदलता राहील. .

१६) परवानादार यांनी जमिनीचा अकृषीक कारणासाठी उपयोग सुरु केल्यापासुन तीन वर्षाचे आंत बिल्डींग व इतर बांधकाम पुर्ण करावे. सदरहु कालावधी **म.अपर जिल्हाधिकारी, मालेगांव** यांना शासकीय आदेशाप्रमाणे परवानेदार यांचेकडुन दंड व नजराणा रक्कम भरुन घेवुन वाढवुन देता येईल.

१७) परवानादार यांनी बिल्डींग व इतर बांधकामे पुर्ण केल्यानंतर त्यामध्ये वाढीव बांधकाम किंवा बांधकामामध्ये बदल पुर्व परवानगी शिवाय व सदरहु बांधकामाचे प्लॅन म.अपर जिल्हाधिकारी मालेगांव /सहाय्यक संचालक नगर रचना/नगरपालीका/महानगरपालीका यांचेकडुन मंजुर करुन घेतल्याशिवाय करु नये.

१८) परवानादार यांचेवर महाराष्ट्र जमिन महसुल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी ) नियम १९६९ चे अनुसुचि ४ किंवा ५ मध्ये नमुद केलेल्या शर्ती व नमुन्यामध्ये सनद बिनशेती उपयोग केल्यापासुन एक महिन्यांचे आंत करुन देण्याचे बंधनकारक राहिल.

१९) अ)परवानदार यांचेकडुन या आदेशात नमुद केलेल्या शर्तीच्या अथवा सनदेमध्ये नमुद केलेल्या शर्तीचा भंग केल्यास महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ व त्याखालील नियमान्वये **म.अपर जिल्हाधिकारी,मालेगांव** जो दंड व सारा फर्मावतील त्या प्रमाणे दंड व सारा भरुन घेवुन त्यांना जमिनीचा अकृषीक कारणासाठी उपयोग पुढे चालु ठेवता येईल.

१९ ब) शर्त क्र.१९ अ मध्ये काहीही शर्ती नमुद केलेल्या असल्यातरी सुध्दा म.अपर जिल्हाधिकारी मालेगांव यांना या परवानगीचे विरुध्द बिल्डींग व इतर बांधकामे केली असल्यास किंवा ते वाढवुन किंवा त्यामध्ये बदल केला असल्यास ते ठराविक मुदतीत काढुन टाकण्यात फर्मावण्याचा कायदेशीर अधिकार राहील व सदर मुदतीत परवानादार यांनी तसे न केल्यास **म.अपर जिल्हाधिकारी,मालेगांव** हे सदरहु बांधकाम काढुन टाकतील व ते बांधकाम काढुन टाकण्याचा खर्च परवानादार यांचे कडुन जमिन महसुलची बाकी म्हणुन वसुल करतील.

२०) सदरहु परवानगी ही इतर कायद्यामधील तरतुदीस अधिन राहुन व सदरहु प्रकरणी त्या कायद्याच्या लागु असलेल्या तरतुदीस अधिन राहुन म्हणजे मुंबई कुळकायदा आणि शेतजमिन अधिनियम १९४८ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व नगरपालिका अधिनियम इ. चे तरतुदीस अधिन राहुन देण्यात येत आहे.

२१) विषयांकित जमिनीतुन जाणारा नैसर्गिक प्रवाह अर्जदार यांना बंद करता येणार नाही.

२२) विषयांकीत जमिनीत पाणी आडवा व पाणी जिरवा (Rain Water Harvesting ) या बाबत नियोजन करणे बंधनकारक राहील.

सही/- xxx
( रघुनाथ गावडे )
**अपर जिल्हाधिकारी,मालेगांव.**

प्रति,
श्रीमती.नर्मदाबाई महेंद्रभाई अमीन व इ.२ रा.संगमेश्वर ता.मालेगांव, जि.नाशिक
प्रत मुळ कागदपत्र क्र.१ ते —— सह तहसिलदार,मालेगांव यांचेकडेस माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

२ /- त्यांना विनंती करण्यांत येते की, परवानदार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर सुरु केल्याबद्दल लक्ष ठेवावे. परवानादार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर सुरु केल्याबाबत कळविल्यानंतर तालुका फार्म नं.२ व गा.नं.२ अकृषिक प्रयोजन नोंदवही मध्ये बिनशेती साऱ्याबाबत योग्य ती नोंद घ्यावी. परवानदार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता वापरलेल्या तारखेपासुन वसुल करण्याचे दृष्टीने घ्यावी व योग्य त्या नमुन्यामध्ये सनद करुन घ्यावी. परवानदार यांनी मोजणी फी भरल्यास तालुका निरीक्षक भुमि अभिलेख नांदगांव यांना त्याप्रमाणे कळवावे व संबंधित जमिनीचा प्लॅन व ७/१२ उतारे सोबत पाठवावे.

टिप :- अर्जदार यांनी रुपांतरीत कराची रक्कम रुपये १,८८,८९५/दिनांक: १२/१०/२०११ व मोजणी फि रक्कम रुपये ३६,०००/-दिनांक १०/०९/२०११ रोजी सरकारी खजिन्यात भरली आहे. त्याची पावती/चलन सोबत जोडली आहे.

प्रत : १) म.जिल्हा निरीक्षक भुमि अभिलेख नाशिक यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.
२) म.सहाय्यक संचालक नगर रचना नाशिक यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.
३) म.आयुक्त,मालेगांव महानगरपालीका मालेगांव ता.मालेगांव जि.नाशिक
४) तलाठी मौजे संगमेश्वर,ता.मालेगांव जि.नाशिक.
५) तालुका निरीक्षक भुमि अभिलेख, मालेगांव यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.

अपर जिल्हाधिकारी

अपर जिल्हाधिकारी, मालेगांव

Scanned with OKEN Scanner